# जाहिर प्रसिध्दीकरण

शहरातील व्यवसायिकांना व नागरीकांना या जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे आवाहन करण्यात येते की सध्या पावसाळयाचे दिवस असून या कालावधीमध्ये साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची ्यता असते. या करीता खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करुन सो.म.न.पास सहकार्य करावे

.) व्यवसाय टिकाणी शुध्द पाण्याचा वापर करावा उत्पादन करीता वापरातील भांडी स्वच्छ व निर्जंतुक करुन वापरावीत गंजलेली व अस्वच्छ भांडी वापरु नये.

२) व्यवसाय टिकाणी पिण्याच्या पाण्याच्या साटवणीकरीता वापरात असलेली भांडी , पिंप , हौद , इ. दैनंदिन जंतुनाशकाचा वापर करुन स्वच्छ टेवावीत.

३) तयार खाद्य पदार्थ उघडे टेवु नयेत. त्यावर धुळ, माशा, किटक, इ पासून संरक्षण होईल अशी जाळी बसविण्यात यावी.

४) आईस कांडी , बर्फ इ. चे उत्पादन शुध्द व निर्जतुक पाण्यापासून करावे.

५) फळांचा ज्युस तयार करण्याकरीता चांगल्या प्रतीच्या फळांचा वापर करावा.

६) पिण्याच्या पाण्यामध्ये तुरटी , मिडीक्लोअर, इ. जंतुनाशकाचा वापर करावा.

७) व्यवसाय टिकाणी निर्माण होणारा कचरा इतस्त न टाकता म.न.पा. च्या कचरा कुंडीतच टाकावा.

८) हात गाड्यावरील खाद्य पदार्थ उत्पादक व्यवसायिकांनी अन्न पदार्थ उघड्यावर टेवु नयेत.संसर्गामुळे खाद्य पदार्थ बिघडणार नाहीत अशी उपाययोजना करावी

व्यवसायिकांनी परवाना शर्ती , अटी व वरील बाबींचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नागरीकांसाटी आवाहन

१) दररोज पिण्याचे पाणी गाळून तसेच उकळून थंड करुन प्यावे.आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्यात तुरटी, मेडीक्लोअर द्रावणाचा दैनंदिन वापर करावा.

२) शिळे अन्न , नासकी, कुजकी खराब फळे , भाज्या व हातगाड्यावरील उघड्यावर विकण्यात येणारे खाद्य पदार्थ खावु नयेत.

३) सार्वजनिक रस्त्यावर मुलांना शौचास बसवून घाण करु नये. आपला परिसर स्वच्छ टेवावा.

४) आपल्या घरात अथवा शेजारी उलटी जुलाबाच्या गॅस्ट्रो सदृष्य रुग्ण आढलल्यास त्यास त्वरीत सिव्हिल हॉस्पिटल समोरील दवाखान्यात (सो.म.पा.आय.डी.एच.) दाखल करुन औषधोपचार करावा.

वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सही/- आयुक्त
सोलापूर महानगरपालिका